स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवी २१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● मंगळवार, दिनांक १० मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ६० ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# दहावी व बारावी परीक्षा गैरप्रकारात कर्मचाऱ्यांवरील कारवाईचा विक्रम !

# बीड चौसाळा 17 कर्मचाऱ्यांवर कारवाई

- गैरप्रकारांशी संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय
- राज्य मंडळाच्या इतिहासात पहिल्यांदाच परीक्षा गैरव्यवहारात प्रकरणी 81 कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले!!
- बीड, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक कर्मचाऱ्यांना दाखविला थेट घराचा रस्ता!!

## सर्वाधिक निलंबन बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यांमध्ये कठोर कारवाई

**बीड : प्रतिनिधी**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येत असलेल्या दहावी, बारावीच्या परीक्षांमधील गैरप्रकारांप्रकरणी आतापर्यंत 81 जणांना निलंबित करण्यात आले असून, राज्य मंडळाच्या इतिहासातील ही विक्रमी कारवाई ठरली आहे. आतापर्यंत बारावी परीक्षेच्या तुलनेत दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकारांची संख्या कमी असल्याचेही दिसून आले आहे. राज्य मंडळातर्फे बारावीची परीक्षा 10 फेब्रुवारी ते 18 मार्च, तर दहावीची परीक्षा 20 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत घेण्यात येत आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले, अशी सविस्तर माहिती लोकसत्ताने प्रकाशित केली आहे.**




### कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह निलंबनाची कारवाई

● राज्य मंडळाकडून परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्हीसह भरारी पथके, पोलीस बंदोबस्त, बैठी पथके, आकस्मिक भेटी, विभागीय मंडळांकडून भरारी पथके अशा विविध उपाययोजना करण्यात आल्या. त्यानंतरही बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, परीक्षार्थ्यांकडे मोबाइल सापडणे असे प्रकार उघडकीस आले. या पार्श्वभूमीवर, गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी तातडीने कठोर भूमिका घेऊन गैरप्रकारांशी संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील प्रकरणात 17 कर्मचाऱ्यांवर कारवाई**

राज्य मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील प्रकरणात 17, कुर्ला तालुक्यातील यशवंत विद्यालय प्रकरणात एक, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जैतापूर येथील प्रकरणात 21, जालना जिल्ह्यातील तीन कनिष्ठ महाविद्यालयांतील गैरप्रकारांमध्ये मिळून पाच, जुमडा फाटा येथील प्रकरणात तीन शाळांतील मिळून 28, गडचिरोली येथील बोमनवार विद्यालयातील गैरप्रकारप्रकरणी 4, नांदेड जिल्ह्यातील बेटमोगरा येथील प्रकरणात 2, तर धाराशिव जिल्ह्यातील सलगरा येथील प्रकरणात 3, अशा एकूण 81 कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यांत केंद्र संचालक, पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, परीरक्षक, शिपाई आदींचा समावेश आहे.

### आतापर्यंत 81 कर्मचाऱ्यांना केले निलंबित




●दहावी-बारावीच्या परीक्षांतील गैरप्रकारांसंदर्भात आतापर्यंत 81 कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. परीक्षा केंद्र, परीक्षा कक्षातील सीसीटीव्ही कॅमेरे परिणामकारक ठरले आहेत. तसेच, जिल्हा दक्षता समितीनेही चांगले काम केले आहे. बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकारांबाबत केलेल्या कारवाईचा परिणाम दहावीच्या परीक्षांवेळी दिसून आला. बारावीच्या तुलनेत दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकारांची संख्या खूपच कमी आहे. - डॉ. नंदकुमार बेडसे, अध्यक्ष, राज्य मंडळ

## 31 मार्चपूर्वी प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज भरा; फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांचे आवाहन

**➤ बीड : प्रतिनिधी**
केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुलाचा लाभ घेण्यासाठी बीड शहरातील पात्र नागरिकांनी 31 मार्च 2026 पूर्वी अर्ज भरावेत, योजनेचे पोर्टल लवकरच बंद होण्याची शक्यता असल्याने इच्छुकांनी तातडीने ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

या योजनेसाठी अर्जदाराकडे स्वत:च्या मालकीची जागा असणे





आवश्यक असून आधार कार्ड (संपूर्ण कुटुंबाचे), राष्ट्रीयकृत बँक खाते, PTR (नगर परिषद), खरेदीखत / PR कार्ड / 7/12 उतारा तसेच उत्पन्न प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सर्व कागदपत्रांसह ऑफलाईन अर्ज नगर परिषद, बीड येथे जमा करणे बंधनकारक आहे. बीड शहरातील पात्र नागरिकांनी लवकरात लवकर अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

## म्हाळसजवळा ग्रामपंचायतीतील मग्रारोहयो कामांची विभागीय चौकशी होणार

**➤ बीड** : ता. बीड येथील मौजे म्हाळसजवळा ग्रामपंचायतीत करण्यात आलेल्या मग्रारोहयो (मनरेगा) अंतर्गत कामांबाबत विभागीय स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मंत्री सामाजिक न्याय विभाग व छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी याबाबत पत्र काढले असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर रामेश्वर खांडे पाटील यांनी म्हाळसजवळा येथील मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार करून चौकशीची मागणी केली होती.



या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी, झालेल्या कामांचा तपशील तसेच या प्रकरणात नोंदविण्यात आलेल्या फौजदारी गुन्ह्यांचा विचार करून विभागीय स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या चौकशीदरम्यान कामांमध्ये तांत्रिक त्रुटी किंवा कोणताही गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी पत्र विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना पाठविण्यात आले आहे.

## मनिषा सचिन पाचपुते यांना आदर्श अंगणवाडी सेविका म्हणुन प्रशासनाकडून गौरव



**➤ विहामांडवा : प्रतिनिधी**
जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि पर्यवेक्षिकांचा 'आदर्श' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शहरातील तापडिया नाट्यमंदिरात पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. पैठण तालुक्यातील नवगाव येथील अंगणवाडी सेविका ● पान २ वर...

## वैचारिक मंचावर कुटुंबासह सामाजिक कार्याचे अभिसरण - डॉ. सारिका क्षीरसागर

**➤ बीड : प्रतिनिधी**
दिनांक ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून बीड शहरातील भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे कार्यक्रमाचे आयोजन पिंगळे परिवारांनी केले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक, गटनेत्या सारिका ताई क्षीरसागर या उपस्थित होत्या. कुटुंब हे समाजाचे मूलभूत घटक असून कुटुंबासह सामाजिक कार्याचे अभिसरण वैचारिक मंचावर घडत असते, असे प्रतिपादन बीड नगरपालिकेच्या विरोधी पक्ष गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर यांनी केले.

संतभगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान जवळील पिंगळे निवासस्थानी असलेल्या ओम विष्णवेनमा उपासना केंद्रात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला गौरव सोहळ्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. माधवी देशपांडे या होत्या.

यावेळी बोलताना डॉ. सारिका क्षीरसागर म्हणाल्या की, सामान्य कुटुंबातील स्त्री आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या जोरावर समाज घडवू शकते. प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे कुटुंबाचा आधार असतो. महिलांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने आपले विचार मांडले पाहिजेत. बीड नगरपालिकेमध्येही आता महिला नगरसेविका आपले विषय समर्थपणे मांडताना दिसत आहेत. आपल्या विचारांसह सनातन संस्कृती मांडण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सौ. प्रतिभा शिरापूरकर यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा माधवी देशपांडे यांचे स्वागत सौ. सुमती पिंगळे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ. सारिका क्षीरसागर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात श्रीमती रेशमताई विर, सौ. निलिमा पाटांगणकर, ● पान २ वर...

## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात; कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ**
माजलगाव येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. समाजाच्या सर्वांगीण विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हीच महिला दिन साजरा करण्यामागील खरी भावना असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या सौ. संगीता जाधव, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. अंजली अकोलकर, राजकीय क्षेत्रात कार्यरत सौ. रूपाली कचरे, माजलगाव शहर पोलीस दलातील श्रीमती रिजवाना सय्यद तसेच बँकिंग क्षेत्रातील सौ. भक्ती मिटकरी यांना






### महत्वाचे ठळक मुद्दे

● माजलगाव येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये जागतिक महिला दिन साजरा ● सामाजिक, वैद्यकीय, राजकीय, पोलीस व बँकिंग क्षेत्रातील पाच महिलांचा गौरव ● "फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी महिला रत्न पुरस्कार" प्रदान
● माता-पालकांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा व विविध उपक्रम
● सुमारे १०० माता-पालकांचा उत्स्फूर्त सहभाग ● महिलांनी व्यवसायिक स्टॉल्स लावून कौशल्याचे सादरीकरण

"फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी महिला रत्न पुरस्कार" प्रदान करून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला.

### विशेष उपक्रम

● माजलगाव येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान व माता-पालकांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रेखा मुगदिया या होत्या. मार्गदर्शक म्हणून तुषार दोडिया ● पान २ वर...

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

## इतिहासाची पुनरावृत्ती, इतिहासावर मात :

# भारताचा टी-२० विश्वचषक विजय

क्रिकेट हा भारतासाठी केवळ खेळ नाही; तो भावना आहे, ओळख आहे आणि कधी कधी संपूर्ण राष्ट्राच्या आत्मविश्वासाचा आरसाही असतो. जेव्हा भारतीय संघाने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात विजय मिळवला, तेव्हा तो फक्त एका ट्रॉफीचा विजय नव्हता; तो कोट्यवधी भारतीयांच्या स्वप्नांचा आणि आशेचा विजय होता. जगातील सर्वात लोकप्रिय आणि रोमांचक स्पर्धांपैकी एक असलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारताने पुन्हा एकदा आपली ताकद सिद्ध केली. अंतिम सामन्यातील या विजयाने भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील अनेक गौरवशाली आठवणींना नव्याने उजाळा दिला. हा विजय म्हणजे इतिहासाची पुनरावृत्तीही आहे आणि इतिहासावर मातही आहे. भारतामध्ये क्रिकेट हा केवळ खेळ नाही; तो लोकांच्या दैनंदिन आयुष्याचा भाग आहे. गावातील धुळीच्या मैदानात खेळणाऱ्या मुलापासून ते आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळणाऱ्या खेळाडूपर्यंत प्रत्येकाच्या मनात एकच स्वप्न असते, भारतीय जर्सी घालून देशासाठी खेळण्याचे. क्रिकेटचा सामना सुरू झाला की घराघरात टीव्हीसमोर गर्दी होते. चहाच्या टपऱ्या, गावातील चौक, शहरातील कॅफे सगळीकडे एकच चर्चा असते : भारत जिंकणार का? म्हणूनच भारताचा विजय हा केवळ खेळाचा निकाल नसतो; तो सामाजिक उत्सव ठरतो.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात काही क्षण असे असतात जे केवळ क्रीडा विजय नसतात, तर राष्ट्रीय आत्मविश्वासाचे प्रतीक बनतात. १९८३ मध्ये कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने जिंकलेला विश्वचषक हा असा पहिला ऐतिहासिक क्षण होता. त्या विजयाने भारतीय क्रिकेटचा चेहरामोहरा बदलून टाकला. त्यानंतर २००७ मध्ये महेंद्रसिंग धोनी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्यांदा टी-२० विश्वचषक जिंकत नवे युग सुरू केले. त्या विजयाने भारतीय क्रिकेटला नवा आत्मविश्वास दिला. त्यानंतर २०२४ मध्ये भारतीय संघाचे कर्णधार रोहित शर्मा यांनी स्पर्धेत उत्कृष्ट नेतृत्व दाखवले. क्रिकेटमध्ये कर्णधार हा केवळ खेळाडू नसतो; तो संघाचा मार्गदर्शक असतो. योग्य वेळी गोलंदाजांचा वापर, अचूक क्षेत्ररचना आणि खेळाडूंवर दाखवलेला विश्वास या सर्व गोष्टींनी संघाला निर्णायक क्षणी बळ दिले. रोहित शर्माच्या नेतृत्वामुळे भारतीय संघामध्ये आत्मविश्वास आणि एकजूट दिसून आली. आज सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वात मिळवलेला दणदणीत विजय हा त्या इतिहासाचीच पुनरावृत्ती आहे. परंतु अधिक परिपक्व आणि अधिक प्रभावी स्वरूपात.

टी-२० क्रिकेटमध्ये फलंदाजीवर अधिक भर दिला जातो; मात्र या अंतिम सामन्यात भारताच्या गोलंदाजांनी विजयाचा पाया रचला. जसप्रीत बुमराह यांची अचूक लाईन-लेंथ, अर्शदीप सिंग यांची स्विंग आणि हार्दीक पांड्या यांची अष्टपैलू कामगिरी यांनी प्रतिस्पर्धी संघाला सतत दबावाखाली ठेवले. क्रिकेटमध्ये असे म्हणतात, फलंदाज सामना जिंकतात; पण गोलंदाज स्पर्धा जिंकून देतात. या विजयातही तेच दिसून आले. अंतिम सामन्यात भारतीय विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो म्हणजे जसप्रीत बुमराह. त्याच्या अचूक यॉर्कर, वेगवान चेंडू आणि शांत स्वभावामुळे प्रतिस्पर्धी फलंदाजांना धावा करणे कठीण झाले. निर्णायक क्षणी घेतलेली त्याची विकेट




भारतासाठी टर्निंग पॉइंट ठरली. त्याच्या शानदार कामगिरीमुळे त्याला "मॅन ऑफ द मॅच" हा किताब मिळाला. क्रिकेटमध्ये गोलंदाज अनेकदा पडद्यामागील नायक असतात; परंतु या सामन्यात बुमराहचा प्रभाव इतका जबरदस्त होता की त्याच्याशिवाय हा विजय कदाचित शक्य झाला नसता.

या संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या खेळाडूंमध्ये संजू सॅमसन याचे नाव विशेषत्वाने घ्यावे लागेल. आपल्या आक्रमक आणि आकर्षक फलंदाजीने त्याने भारतीय संघाला अनेक सामन्यांत दमदार सुरुवात करून दिली. निर्णायक क्षणी खेळलेल्या त्याच्या खेळींनी संघाला विजयाच्या दिशेने नेले. सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरीमुळे त्याला "मॅन ऑफ द टूर्नामेंट" हा मानाचा किताब मिळाला. सॅमसनच्या या यशामुळे भारतीय क्रिकेटला एक नवा तारा मिळाल्याची भावना अनेक क्रिकेटप्रेमींनी व्यक्त केली.



विशेष

**प्रवीण बागडे**
नागपूर मो.क्र. ९९२३६२०९१९

अंतिम सामन्यात भारताचा सामना न्यूझीलंड या मजबूत संघाशी झाला. न्यूझीलंडचे कर्णधार हे शांत स्वभावाचे आणि रणनीतीत पारंगत नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या संघाने अंतिम सामन्यात जोरदार संघर्ष केला; मात्र भारतीय गोलंदाजीची धार, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि संयम यामुळे शेवटी विजय भारताच्या बाजूने झुकला.

भारतामध्ये क्रिकेटमध्ये मोठा विजय मिळाला की तो राष्ट्रीय उत्सव ठरतो. रस्त्यांवर फटाके फुटतात, लोक एकमेकांना मिठी मारतात आणि संपूर्ण देश आनंदाच्या लाटेत न्हाऊन निघतो. हा आनंद क्षणिक असला तरी तो लोकांच्या मनात नवी ऊर्जा निर्माण करतो. दैनंदिन जीवनातील संघर्ष, आर्थिक अडचणी आणि सामाजिक ताण यांच्या दरम्यान हा विजय लोकांना आशेची नवी किरण देतो. गेल्या काही वर्षांत भारताला अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये निराशा स्वीकारावी लागली होती. उपांत्य फेरीतील किंवा अंतिम सामन्यातील पराभवांनी चाहत्यांच्या मनात खंत निर्माण झाली होती. परंतु पराभव हा कधी कधी यशाचा पाया ठरतो. त्या अपयशांनी भारतीय संघाला अधिक मजबूत बनवले. आजचा विजय म्हणजे त्या सर्व पराभवांना दिलेले ठोस उत्तर आहे.

भारतीय क्रिकेटच्या यशामागे व्यवस्थेचेही मोठे योगदान आहे. बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया यांनी गेल्या काही वर्षांत क्रिकेटच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. तसेच इंडियन प्रीमियर लीग मुळे भारतीय खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळाला. या स्पर्धेमुळे अनेक तरुण खेळाडूंना मोठ्या मंचावर चमकण्याची संधी मिळाली. भारतीय संघाचा हा विजय लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. गावोगाव क्रिकेट खेळणारी मुले आज हा सामना पाहून मोठी स्वप्ने पाहत असतील. कारण भारतीय क्रिकेटची कहाणी अजून संपलेली नाही; उलट ती दिवसेंदिवस अधिक रोमांचक होत चालली आहे.

क्रीडा ही केवळ मनोरंजन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याचे माध्यम आहे. ती शिस्त, मेहनत आणि संघभावना शिकवते. भारतीय संघाचा हा विजय त्या मूल्यांना अधिक बळ देणारा आहे. "Repeat history, defeat history" या वाक्याचा खरा अर्थ भारताच्या या विजयाने स्पष्ट केला. इतिहासाची पुनरावृत्ती करताना भारतीय संघाने जुन्या अपयशांवर मात करत नव्या इतिहासाची निर्मिती केली. अंतिम सामन्यात जसप्रीत बुमराह याने "मॅन ऑफ द मॅच" मिळवत विजयाची पायाभरणी केली, तर संपूर्ण स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसन ने "मॅन ऑफ द टूर्नामेंट" मिळवत भारतीय क्रिकेटच्या भविष्याची नवी दिशा दाखवली.

भारताचा हा टी-२० विश्वचषक विजय म्हणजे केवळ एका सामन्याचा परिणाम नाही. तो दीर्घकाळाच्या मेहनतीचा, संयमाचा आणि संघभावनेचा परिपाक आहे. या विजयाने भारतीय क्रिकेट पुन्हा एकदा जगाच्या शिखरावर पोहोचले आहे. आज संपूर्ण देश अभिमानाने एकच वाक्य म्हणत आहे, भारत पुन्हा एकदा न्यूझीलंड संघाला धूळ चारत विश्वविजेता ठरला. टी-२० विश्वचषक स्पर्धेत विजय मिळवल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे हार्दिक अभिनंदन!

# महिला दिनानिमित्त 'नारी की अष्ट शक्तियां' विषयावर प्रेरणादायी कार्यक्रम

८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ९ मार्च रोजी ब्रह्माकुमारी संस्थानच्या वतीने "नारी की अष्ट शक्तियां" या विषयावर एक प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संध्या मोहिते, श्वेता त्रिवेदी आणि मंगल रोडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला, युवक-युवती तसेच समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.









कार्यक्रमाची सुरुवात शांततामय आणि आध्यात्मिक वातावरणात झाली. रूपा दीदी यांनी प्रास्ताविक करताना ब्रह्माकुमारी संस्थेच्या माध्यमातून स्त्रीच्या आत्मिक जागृतीसाठी आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी होत असलेल्या कार्याची माहिती दिली. स्त्री ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या उन्नतीची आधारशिला आहे, असे सांगत त्यांनी "नारी की अष्ट शक्तियां" या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सुंदर आणि प्रभावी सूत्रसंचालन ज्योती ठाकरे यांनी केले. त्यांनी आपल्या ओघवत्या शब्दांत कार्यक्रमाची सांगता आणि विविध वक्त्यांची ओळख करून देत वातावरण अधिक प्रेरणादायी बनवले.

यावेळी बोलताना डॉ. संध्या मोहिते यांनी स्त्रीच्या आठ शक्तींविषयी सखोल विचार मांडले. त्यांनी सांगितले की प्रत्येक स्त्रीमध्ये नैसर्गिकरित्या सहनशीलता, प्रेम, धैर्य, निर्णयक्षमता, सकारात्मकता, सेवा भावना, संयम आणि आत्मविश्वास या आठ शक्ती दडलेल्या असतात. या शक्तींचा योग्य उपयोग केला, तर स्त्री स्वतःचे आयुष्य घडवू शकते आणि समाजालाही योग्य दिशा देऊ शकते.

डॉ. मोहिते यांनी आपल्या भाषणात सकारात्मक विचारांची



विशेष

**डॉ. संध्या मोहिते**
सूत्रसंचालन, लेखीका, कवियीत्री

शक्ती आणि स्त्रीची कर्तृत्वशक्ती यावर विशेष भर दिला. इतिहासातील अनेक प्रेरणादायी उदाहरणे देत त्यांनी स्पष्ट केले की जेव्हा स्त्रीने आपल्या अंतःकरणातील शक्ती ओळखली, तेव्हा तिने समाजात मोठे परिवर्तन घडवून आणले. शिक्षण, साहित्य, समाजसेवा, स्वातंत्र्य चळवळ आणि विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा त्यांनी उल्लेख केला. आजच्या काळात स्त्रीने आत्मविश्वास, सकारात्मकता आणि आध्यात्मिकता यांचा आधार घेत पुढे जाण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी श्वेता त्रिवेदी आणि मंगल रोडे यांनीही स्त्रीच्या आत्मबल, संस्कार आणि आध्यात्मिकतेच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. ब्रह्माकुमारी संस्थेच्या राजयोग ध्यानाच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मिक शक्ती जागृत होत असून त्यातून कुटुंब आणि समाजात शांतता, प्रेम आणि समरसता निर्माण होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचा संपूर्ण वातावरण प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक होते. उपस्थित महिलांनी या विचारांमधून नव्या उमेदीने जीवन जगण्याची प्रेरणा घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्त्रीशक्तीचा सन्मान राखत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प केला. अशा प्रकारे ब्रह्माकुमारी संस्थानच्या वतीने आयोजित केलेला हा कार्यक्रम महिला दिनाचे औचित्य साधत नारी शक्तीचा गौरव करणारा आणि आत्मिक जागृतीचा संदेश देणारा ठरला.

## फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये ...

● पान १ वरून ... यांची उपस्थिती लाभली. तसेच माजलगावमधील महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या "होम मिनिस्टर" स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पाच माता-पालकांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ऐश्वर्या चांडक यांनी केले. त्यांनी फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचे भविष्यातील शैक्षणिक उद्दिष्ट, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आखलेली रूपरेषा आणि पालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. संस्थाचालक पांडुरंग चांडक यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सारिका बजाज यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापिका ज्योती बनसोडे व उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड यांनी सहकार्य केले. सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास माया चांडक यांचीही उपस्थिती होती.

- माता-पालकांसाठी विशेष उपक्रम :

कार्यक्रमादरम्यान माता-पालकांसाठी विविध मनोरंजक व ज्ञानवर्धक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये सुमारे १०० माता-पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच माजलगाव पंचक्रोशीतील महिलांनी विविध व्यवसायिक स्टॉल्स लावून आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. या उपक्रमामुळे महिलांना स्वावलंबनासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

यावेळी घेण्यात आलेल्या "होम मिनिस्टर" स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. आंदेकर, द्वितीय क्रमांक सौ. स्वाती गायकवाड तर तृतीय क्रमांक सौ. रिटा बाहेती यांनी पटकावला. एकूणच फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीमध्ये साजरा झालेला महिला दिन महिला सन्मान, प्रेरणा आणि आत्मविश्वास वाढविणारा ठरला. कार्यक्रमात महिला शिक्षक, पालक आणि उपस्थित पाहुण्यांनी उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## मनिषा सचिन पाचपुते यांना...

● पान १ वरून ... मनिषा सचिन पाचपुते यांना २०२५-२६ या वर्षातील उल्लेखनीय सेवेसाठी ए.बा.वि.से.योजना अंतर्गत पैठण प्रकल्प -१ मधुन आदर्श अंगणवाडी सेविका' (प्रथम क्रमांक) पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बालकांचे पोषण, लसीकरण जनजागृती आणि कुपोषण मुक्तीसाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली. राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना ट्रॉफी व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

## वैचारिक मंचावर कुटुंबासह सामाजिक ..

● पान १ वरून ... डॉ. सीमा जोशी, सौ. संध्या रावसाहेब पाठक, मंगला भाले, आरती संदीप मसलेकर, चित्रा रांजणकर व संध्या शिरापूरकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात सौ. माधवी देशपांडे म्हणाल्या की, कुटुंब हा समाजाचा पाया आहे. प्रथम कुटुंब संस्कारित झाले तर समाज आणि देश आपोआप संस्कारित होतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सुमती पिंगळे यांनी केले तर सूत्रसंचालन महेश पिंगळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी वैशाली पैठणकर यांनी आभार मानले. प्रार्थना सौ. प्रज्ञा वर्तक यांनी सादर केली. कार्यक्रमाचे नियोजन जगदीश पिंगळे, सौ. शितल पिंगळे, डॉ. सौ. रेखा पिंगळे, सौ. चित्रा औसेकर, नंदिनी पिंगळे व सौ. सई धसे यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



## महिलादिनी सांभाळला थेटेगव्हाण आश्रम शाळेचा मुलींनी कारभार..!

**धारूर/प्रतिनिधी :**
८ मार्च जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करण्यात आला .काही क्षेत्रांपुरतीच मर्यादित असणारी स्त्री . . !आज प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने " गल्लीपासून . . ! ते दिल्लीपर्यंत . . ! " धरणी मातेची ओटी भरण्यापासून . . . ! ते भारत भूमीचे सीमेवर रक्षण करण्यापर्यंतचे . . . ! सर्व कामामध्ये महिला आपल्या कार्याचा ठसा . . . ! उमटवत आहेत . जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने " शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण कॅम्प ( कांदेवाडी ) ता .धारूर जि . बीड या शाळेमध्ये एक आगळा-वेगळा सृजनशील नवोपक्रम राबवण्यात आला .आठ मार्च या दिवसभरातील शालेय प्रशासनाचा सर्व कारभार शाळेतील मुलींनीच व्यवस्थित रित्या पार पडला .यामध्ये मुख्याध्यापिका म्हणून रेखा अंभुरे,शिक्षिका श्यामबाला वाकतकर,रुक्मिणा जटाळे,आरती माळी,जयश्री ढाकरे,अधीक्षिका रुक्मिणा तनपुरे,नर्स/परिचारिका वैष्णवी चाफे,शिपाई वर्षा माळी या विद्यार्थिनींनी आप-आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडत शालेय कामकाज आनंददायी आणि उत्साही वातावरणामध्ये पार पाडले .जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हा नवोपक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री .सखाराम वनवे सर यांच्या संकल्पनेतून साकारला .या उपक्रमाचे छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी "श्रीमती चेतना मोरे मॅडम,पालक अधिकारी डॉ . उद्धव वायाळ सर तसेच शिक्षण अधिकारी श्री .गजानन बनसोडे सर व प्रकल्पाचे इतर सर्व अधिकारी वर्गाने,या राबवलेल्या उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच अभिनंदन करून,असेच नवनवीन शालेय उपक्रम राबवण्यासाठी सर्वोतपरी मदत करण्यासाठी प्रशासन नेहमी तुमच्या पाठीशी आहे . हा उपक्रम राबवण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी परिश्रम घेतले .

## फुले नगरच्या जैद मोसीन पटेलचा पहिला रोजा



**माजलगाव / प्रतिनिधी :**
पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहरातील फुले नगर परिसरातील जैद मोसीन पटेल ( वय ६ ) या चिमुकल्याने उत्साहात आपला पहिला रोजा पूर्ण केला . लहान वयातच धार्मिक परंपरा जपत त्याने रोजा पाळल्याने परिसरात त्याचे कौतुक होत आहे .

जैदने पहाटे सहरी करून दिवसभर उपवास पाळला आणि सायंकाळी इफ्तार करून रोजा पूर्ण केला . त्याच्या या पहिल्या रोजाच्या निमित्ताने कुटुंबीय व नातेवाईकांनी त्याचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या .

रमजान महिन्यात लहान मुलांमध्येही उपवास, नमाज व धार्मिक संस्कारांविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे या निमित्ताने पाहायला मिळत आहे .

### कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव

- माजलगाव येथील फुले नगरमधील ६ वर्षीय जैद मोसीन पटेलचा पहिला रोजा .
- रमजान महिन्यात लहान वयातच धार्मिक परंपरेचे पालन .
- कुटुंबीय व नातेवाईकांकडून कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव .

# कन्नडमधील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ बरखास्त

### ➤ भूखंड विक्री प्रकरणी धर्मादाय आयुक्तांचा मोठा निर्णय

**➤कन्नड / प्रतिनिधी :**
कन्नड शहरातील शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान असलेल्या छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षासह कार्यकारी संचालक मंडळाला विश्वस्त मंडळातून काढून टाकण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सह धर्मादाय आयुक्त आर . एस . पावसकर यांनी दिला आहे . या निर्णयात संस्थेचे अध्यक्ष उद्योगपती मानसिंग पवार, उपाध्यक्ष डॉ . पंढरीनाथ निकम, सचिव चंद्रकांत देशमुख, तसेच सदस्य संचालक डॉ . आनंदराव महाले, बाबासाहेब मोहिते, कृष्णराव पाटील यांचा समावेश आहे . दरम्यान, सदस्य अशोकराव आहेर, डी . डी . शिंदे आणि चिंतामणराव मोरे यांचे निधन झाले आहे .

या प्रकरणी बिपिन राजाराम थोरात आणि दिलीपराव नारायणराव पाटील यांनी १९ मे २०१६ रोजी धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती . तक्रारीत संस्थेच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला होता . महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-ड अंतर्गत संबंधित विश्वस्तांना पदावरून हटविण्याची मागणी करण्यात आली होती .

तक्रारीनुसार, संस्थेच्या ताब्यातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयासमोरील मोकळ्या जागेवर बेकायदेशीर नकाशे तयार करून प्लॉट क्रमांक १०७ ते १२६ असे प्लॉट तयार करण्यात आले व त्यांची विक्री करण्यात आली .

तसेच, प्राचार्य डॉ . विजय नानासाहेब भोसले हे कन्नड येथील कनिष्ठ महाविद्यालयात अध्यापक असताना त्यांची शिवाजी वरिष्ठ महाविद्यालयात पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून बेकायदेशीर नियुक्ती करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला होता . यामुळे त्यांना ट्रस्टच्या खात्यातून १ लाख ८६ हजार २४५ रुपये जास्त वेतन देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते .या प्रकरणाची तब्बल ९ वर्षे ९ महिने ८ दिवस सुनावणी झाल्यानंतर सह धर्मादाय आयुक्त आर . एस . पावसकर यांनी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम निकाल दिला .तसेच संस्थेच्या ताब्यातील भूखंडावर जे प्लॉट तयार करून विक्री करण्यात आली, त्या जागेचा ताबा परत मिळवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत . या निर्णयामुळे कन्नड तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे .

# एनएमएमएस परीक्षेत चौंडेश्वरी क्लासेसचा दबदबा; ५ वर्षे तालुक्यात अव्वल

**वडवणी / अशोक फपाळ :**
वडवणी येथील चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसच्या वतीने एनएमएमएस-२०२५ परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ व विद्यार्थी-पालक मेळावा हिंगलाज माता मंदिर, वडवणी येथे रविवार दि .८ मार्च २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला .

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा . अंकुशजी पवार सर, संजयजी तिडके तसेच प्रा . गंगाभिष्म अंडील सर मान्यवर म्हणून उपस्थित होते . मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .

प्रास्ताविक करताना क्लासेसचे संचालक सुरज टोंपे सर यांनी चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला . त्यांनी सांगितले की, क्लासेसचा विद्यार्थी गेल्या सलग पाच वर्षांपासून एनएमएमएस परीक्षेत



वडवणी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत असून हा क्लासेससाठी अभिमानास्पद आणि ऐतिहासिक विक्रम आहे . ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य मार्गदर्शन, जिद्द आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर मोठे यश संपादन करता येते, असेही त्यांनी नमूद केले .

यानंतर पालक प्रतिनिधी संजयजी तिडके आणि प्रा . गंगाभिष्म अंडील सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले . कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा . अंकुशजी पवार सर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व समजावून सांगत सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले . या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन परिसरातील सुप्रसिद्ध निवेदक अमोलजी राठोड सर यांनी ओघवत्या शैलीत केले . त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमाला अधिक रंगत आली . या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून शिक्षणाच्या माध्यमातून मोठे यश संपादन करण्याची प्रेरणा सर्वांना मिळाली .

कार्यक्रमाच्या शेवटी क्लासेसचे संचालक तुकारामजी दिवटे सर यांनी उपस्थित मान्यवर, पालक व विद्यार्थ्यांचे मन :पूर्वक आभार मानले . या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

# ॲड. लखन सोनवणे यांच्या विधी कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

**केज/प्रतिनिधी :**
केज शहरात ॲड . लखन विजयराव सोनवणे यांच्या विधी कार्यालयाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले . या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून छत्रपती संभाजी नगर येथील उच्च न्यायालय खंडपीठाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड . निलेशजी घाणेकर व शुभ आशीर्वाद :- ह .भ . प . केशव महाराज शास्त्री तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ . सौ .सीताताई बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ .हारुणभाई इनामदार, भाजपचे ज्येष्ठ नेते रमाकांत मुंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ . वासुदेव नेहरकर, माजी जि .प . सदस्य विजयकांत मुंडे, माजी पंचायत समिती उपसभापती विष्णू घुले, नगरसेविका पद्मिनी आक्का शिंदे, डॉ .कुटे ,नगरसेवक बाळासाहेब गाढवे, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, वंचित चे ज्येष्ठ नेते धनराज सोनवणे, वंचित चे ज्येष्ठ नेते रज्जाक सय्यद, रिपाईचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,मा . न्यायाधीश ॲड . प्रशांत गिरी, छत्रपती संभाजी नगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड .अशोक केकान, ॲड . मच्छिंद्र दळवी, युवा नेते राहुल भैया गदळे, जीवाचीवाडीचे माजी सरपंच महादेव चौरे, काशीदवाडीचे माजी सरपंच महादेव जाधव, रिपाई चे ज्येष्ठ नेते दिलीप बनसोड, यांची प्रमुख उपस्थिती होती .

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप-दिपाणी पूजा करून फित कापून विधी कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले .

यावेळी ॲड . लखन विजयराव सोनवणे व सोनवणे परिवाराच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला . यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून ॲड . लखन सोनवणे यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांच्या पुढील व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या . ज्येष्ठ विधीज्ञ श्री सपाटे साहेब यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले . या



कार्यक्रमाचे उद्घाटक ॲड .निलेशजी घाणेकर म्हणाले की, ॲड . लखन सोनवणे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजी नगर येथील उच्च न्यायालय खंडपीठ येथे उत्कृष्टपणे प्रॅक्टिस केलेली आहे . सोनवणे यांचा आमच्या क्षेत्रातील अभ्यास हा परिपूर्ण झालेला असून त्यांना या क्षेत्रातील कामाचा पूर्णपणे अनुभव लाभलेला आहे . केज सह परिसरातील नागरिकांना नक्कीच त्यांच्या कामाचा अनुभव लाभणार आहे . लखन सोनवणे हे या भागातील नागरिकांना नक्कीच आपल्या व्यवसायाच्या माध्यमातून न्याय मिळवून देतील असा विश्वास ॲड . निलेशजी घाणेकर यांनी व्यक्त करून ॲड . लखन सोनवणे यांच्या व्यवसायाला शुभेच्छा दिल्या .

यावेळी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी म्हटले की, केज येथे वकील क्षेत्रामध्ये काम करत असताना ॲड . लखन सोनवणे यांनी माणसातला माणूस शोधण्याचे काम करावे . नक्कीच तुम्ही माणसांमधील माणूस शोधला तर आपण आपल्या व्यवसायामध्ये लवकरच नावलौकिक होणार व आपला हा व्यवसाय उंच शिखरापर्यंत लवकरच पोहोचेल . पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, गेल्या सहा महिन्यापासून ॲड . लखन सोनवणे यांनी केज येथील जिल्हा सत्र न्यायालयात प्रॅक्टिस करण्याचे काम चालू केले तेव्हापासून बरीचशी प्रकरणे चांगल्या प्रकारे हाताळली आहेत याची चर्चा आमच्यासारख्या पर्यंत पोहोचली आहे त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे .वकील क्षेत्रात देखील तज्ञ वकिली हे आमच्या केजला लाभले त्यामुळे आम्हाला आमच्या अडचणी सोडवणे साठी सोयीचे झाले आहे . आपण आपल्या व्यवसायात असेच कार्य करत राहावे आम्ही आपल्या सोबत कायम आहोत अशी ग्वाही इनामदार यांनी दिली .

अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना नगराध्यक्ष सीताताई बनसोड म्हणाले की, छत्रपती संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरांमध्ये प्रॅक्टिस करून आपल्या गावाच्या ठिकाणी येऊन वकील या क्षेत्रातील व्यवसाय करण्याची ॲड . लखन सोनवणे यांनी जिद्द बाळगले त्याबद्दल त्यांचे नगराध्यक्षा बनसोड यांनी कौतुक केले . पुढे बोलताना नगराध्यक्षा बनसोड म्हणाले की, ॲड . लखन सोनवणे यांच्या कामाचा अनुभव मी जवळून पाहिला आहे त्यांचे वकील या क्षेत्रात उत्कृष्ट असे काम आहे त्यामुळे ॲड . लखन सोनवणे हे फक्त वकील म्हणून काम थोड्या दिवस करतील त्यांची जिद्द पाहून असे मला वाटते की, भविष्यात लवकरच ते जज होतील . आमच्या वकील साहेबांना मला यापुढे वकील म्हणून पाहण्यापेक्षा त्यांना पुढील काळात जज म्हणून पाहिजे आहे .

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अशोक सोनवणे, विजय सोनवणे, पत्रकार वसंत सोनवणे, पत्रकार तात्या गवळी, पत्रकार महादेव काळे, रवींद्र मेटे, ज्योतीराम सावंत, विकास सोनवणे यांच्यासह सामाजिक, राजकीय,शैक्षणिक, संप्रदाय, वैद्यकीय, पत्रकार, वकील क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनवणे परिवार व ॲड . लखन सोनवणे यांचे सहकारी व मित्रपरिवार यांनी अथक परिश्रम घेतले . या कार्यक्रमाची सांगता शेवटी अल्पोपहारणे करण्यात आली .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संत ज्ञानेश्वर गुरुकुलचे सचिव दादासाहेब कराड यांनी केले तर उपस्थितांचे आभार अशोक सोनवणे यांनी मानले .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी ( हिंदी )
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# कॉंग्रेस पक्षाच्या मागणीला पाटोदा नगर पंचायत कडुन साद

➤ **पाटोदा : प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक येथे होत असलेल्या वाहतुक कोंडी विषयी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अँड .विशाल मस्के, पाटोदा तालुका अध्यक्ष राहुल जाधव, पत्रकार हमीदखान पठाण व इतर कार्यकर्ते यांनी पाटोदा पोलिस स्टेशन व नगर पंचायत पाटोदा यांना लेखी निवेदन देऊन कळविले होते की ;

पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक हा रहदारीचा चौक असुन १) पारगांव रोड, २) महासांगवी रोड, ३) बीड, मांजरसुंबा मार्गे येणारा मुख्य रोड, ४) पाटोदा शहराचे बाजारतळातुन येणारा मुख्य रोड असे प्रमुख रस्ते या चौकात येऊन मिळतात . जामखेड ते सौताडा मार्गे चुंबळीफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सद्यस्थितीत चालु असल्याने बीड व मांजरसुंबा मार्गे जामखेड कडे येणारी व जाणारी बरीचशी वाहने ही या चौकातुन जात आहेत . त्यामुळे या चौकात वाहतुकीची कोंडी होताना दिसत असुन यामुळे जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही . त्यामुळे योग्य ते नियोजन करून राज मोहम्मद चौक येथील वाहतुक नियंत्रणात ठेवुन जिवीत हानी टाळली जावी या करीता योग्य ती उपाय योजना करण्याची मागणी केल्यावरून पाटोदा नगर पंचायत यांनी पोलिस निरिक्षक साहेब, पोलिस स्टेशन पाटोदा यांना दि . ०४/०३/२०२६ रोजी पत्र देऊन पाटोदा येथील राज मोहम्मद चौकात वाहतुक पोलिसांची नियुक्ती करावी, वाहतुक नियंत्रणाची उपाय योजना करावी, व आवश्यक ती कडक कारवाई करण्यात यावी . सदर बाबींकडे तातडीने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करण्यात यावी यासाठी नगर पंचायत पातळीवरून आवश्यक ते सहकार्य करण्यात येणार असल्याचे कळवण्यात आले आहे .

त्यामुळे पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौकातील वाहतुक नियंत्रण पोलिस प्रशासन व नगर पंचायत पाटोदा योग्यरित्या करतील व वाहतुक सुरळीतपणे करून जिवीतहानी टाळतील अशी अपेक्षा जनतेकडुन व्यक्त केली जात आहे, त्याच बरोबर कॉंग्रेस पक्षाने घेतलेल्या पुढाकाराचे देखील सर्व स्तरातुन कौतुक होत आहे . यावेळी पत्रकारांशी बोलताना कॉंग्रेस पक्षाच्या मागणीला यश आले असल्याचे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अँड . विशाल मस्के यांनी सांगितले .

# माझा ड्रेस पाहून मुलाला वाटयच मी पण वडिला सारखेच भारतीय सैन्य दलात जावं

## माझा इनिफार्म पुढील पुढीने हि घरातच ठेवला याचा मला खूप अभिमान-सेवानिवृत्त सुभेदार नवनाथ शेकडे

**बाप से बडा बेटा, म्हसोबावाडी येथील सैनिकाचा मुलगा झाला मोठा अधिकारी** | **मराठवाड्यातील पहिली मिरवणूक** | **सुभेदार पदावरुन वडिल सेवानिवृत्त होताच, मुलगा झाला सैन्य दलात मोठा ऑफीसर** | **वडिला सोबत मुलाची मिरवणूक**

➤ **आष्टी : प्रतिनिधी**

देशसेवा करने खूप चांगले आहे, आमची दुसरी पिढी देशसेवेसाठी सज्ज झाली याचा मला खूप अभिमान आहे, माझी वर्दी पाहून चि .अजयला वाटायच मी पण वडिलासारखे सारखे व्हाव . आज मी ३३ वर्ष देशसेवा पूर्ण केली व सेवानिवृत्त होताच माझा मुलगा चि . अजय नवनाथ शेकडे हा सैन्य दलातील सर्वात मोठया पदावर ऑफीसर वर्ग 1 पदी विराजमान झाला याचा मला खूप अभिमान आहे . .

व आमच्या गावच्या म्हसोवाडी ग्रामस्थांनी बाप लेकाची एकाच सजवलेल्या चार चाकी गाडी मधून वाजत गाजत, फुलांची पुष्पवृष्टी करत, फटाक्यांची आतषबाजी भव्य दिव्य मिरवणूक काढून जंगी स्वागत केले हा स्वागत सोहळा पाहून मी अक्षरश :हा भारावून गेलो आसे सेवानिवृत्त सुभेदार नवनाथ नानाभाउ शेकडे यांची सांगितले . आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी अगदी एक हजार लोकसंख्या आसलेले गाव, अतिशय डोंगराच्या उंच टेकडीवर अहिल्या नगर धामणगाव हावे लगतचे हे गाव आहे, येथील नागरिक शेती व उसतोडी कामगार आहेत . लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना मानणारे हे महसोबावाडी गाव आहे , या गावांमधून प्रथम १९९३ साली नवनाथ नानाभाउ शेकडे सैन्य दलात भरती झाले व त्यानंतर अहमदनगर, पटियाला पंजाब, राजस्थान सुरजगड, पंजाब पठाणपूर, राची, येथे सैन्य दलात नौकरी करूण आज नवनाथ शेकडे सूभेदार हे सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांचे म्हसोबावाडी गावात अगमन होताच





ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करत चार चाकी गाडी रंगीबेरंगी फुलांनी सजवून देशाची शान तिरंगा ध्वज गाडीला लावून, भारत मातेच्या घोषणा देऊन, वाजत गाजत भव्य दिव्य बाप लेकाची मिरवणूक काढण्यात आली, यावेळी या मिरवणुकीत चिमूकले मुले, तरूण, व वयोवृद्ध व्यक्तींनी सुभेदार नवनाथ नानाभाउ शेकडे व त्यांचे चि अजय नवनाथ शेकडे यांच्यावर पुष्पवृष्टी करत जंगी स्वागत केले आहे .

यावेळी सुभेदार नवनाथ शेकडे यांनी सांगितले की देशसेवा खूप चांगले मी इथून पुढे समाजात युवकांनी देशसेवेसाठी सैन्य दलात भरती व्हावे यासाठी मार्गदर्शन करणार व माझा मुलगा देशसेवेसाठी सैन्य दलात माझ्यापेक्षा मोठा अधिकारी झाला याचा मला खूप अभिमान आहे, माझे दररोजचे कपडे पाहून, त्याला वाटवायच वडिलासारखे व्हावे, चि . अजयने माझ्या पेक्षा मोठया पदाला गवसणी घातली याबद्दल मला माझ्या मुलाचा खूप अभिमान वाटतो, माझी दुसरी पिढी देशसेवेसाठी सज्ज झाली याच समाधान वाटत आहे आसे सुभेदार नवनाथ शेकडे यांनी सांगितले आहे .

# पैठणमध्ये ४२७ व्या नाथ षष्ठी सोहळ्याला नगर प्रदक्षिणेने प्रारंभ

## शेकडो दिंड्या, वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग; गोदावरी स्नानानंतर भजन-कीर्तनांनी पैठण नगरी दुमदुमली

➤ **पैठण : सर्जेराव खडसन**

"अधिष्ठान जेथे प्रतिष्ठान देखा, तिथे जन्मला तो गुणातीथ एका, नमस्कार माझा सदगुरु एकनाथा" या जयघोषात दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण नगरीत ४२७ व्या नाथ षष्ठीच्या मुख्य तीन दिवसीय उत्सवाला नगर प्रदक्षिणेने उत्साहात प्रारंभ झाला .

### यात्रेतील खास क्षणचित्रे

● नगर प्रदक्षिणेसाठी निघालेल्या दिंड्यांवर शहरवासीयांकडून पुष्पवृष्टी .● "भानुदास-एकनाथ" नामघोषात वारकरी तल्लीन होऊन नाचत-गात पुढे सरकत होते .● सामाजिक संघटनांकडून वारकऱ्यांना प्रसाद व सेवा उपक्रम . ● प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यात्रेच्या व्यवस्थेत सक्रिय .● पोलिसांनी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवली . ● यात्रेत सुमारे एक हजार संत-महंत व महाराज सहभागी .● दिंड्यांच्या फडांवर भजन, कीर्तन, भारूड व जागर कार्यक्रमांची रेलचेल .

### नाथ षष्ठीचे वैशिष्ट्य :

● नाथांचे गुरु जनार्धन स्वामी यांचा जन्म फाल्गुन वद्य षष्ठीला .● जनार्धन स्वामी व संत एकनाथ यांची पहिली भेट याच दिवशी .● जनार्धन स्वामींनी नाथांना दत्तात्रेयांचे दर्शन घडविले .● नाथांना शूलभंजन येथे भगवान श्रीकृष्णाचे दर्शन .● जनार्धन स्वामींनी देहत्यागही फाल्गुन वद्य षष्ठीलाच केला .● संत एकनाथांनी पैठणच्या कृष्णकमल तीर्थावर गोदावरीत जलसमाधी घेतली .

### नाथ षष्ठीतील प्रमुख उत्सव :

● ९ मार्च – नाथांचा जलसमाधी उत्सव
● १० मार्च – छबिना उत्सव व संत-महंतांचा सत्कार
● ११ मार्च – नाथ काला अष्टमी सोहळा

● पैठण येथे ४२७ व्या नाथ षष्ठीच्या मुख्य तीन - दिवसीय उत्सवाला सुरुवात .● पहाटे गोदावरी स्नान करून सुमारे ५०० पेक्षा अधिक दिंड्यांची नगर प्रदक्षिणा .● विजयी पांडुरंग व नाथ समाधी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी . ● संत-महंतांच्या कीर्तनातून संत एकनाथांच्या जलसमाधीचा उल्लेख .● जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व आमदार विलास बापू भुमरे यांच्या हस्ते महाभिषेक



### गोदावरी नदीत पवित्र स्नान करून नगर प्रदक्षिणेस सुरुवात

भल्या पहाटे नाथ षष्ठी सोहळ्यासाठी आलेल्या सुमारे पाचशेहून अधिक दिंड्यांतील वारकरी भाविकांनी नाथसागर परिसर व वाळवंटातील गोदावरी नदीत पवित्र स्नान करून नगर प्रदक्षिणेस सुरुवात केली . संतपीठ, नाराळा, दक्षिण काशी मैदान, नवीन कावसन, यशवंतनगर, लक्ष्मीनगर, साळीवाडा, पावर हाऊस परिसर, नागघाट, रंगारहट्टी घाट, वाळवंट परिसर, संतनगर आदी भागातून दिंड्या नाथ मंदिरातील विजयी पांडुरंग व नाथ समाधी दर्शनासाठी निघाल्या .

दुपारनंतर गावातील नाथ मंदिरातून नाथ वंशजांसह मानाच्या दिंड्याही नगर प्रदक्षिणेत सहभागी झाल्या . बाहेरगावाहून आलेल्या दिंड्यांची प्रदक्षिणा मध्यरात्रीपर्यंत सुरू राहते . विविध दिंड्यांच्या फडांवर संत एकनाथांनी फाल्गुन वद्य षष्ठीला सन १५९९ मध्ये पैठणच्या कृष्णकमल तीर्थावर गोदावरीत जलसमाधी घेतल्याच्या घटनेवर आधारित कीर्तने झाली . या कीर्तनांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली . फाल्गुन वद्य षष्ठीच्या मध्यरात्रीनंतर नाथ मंदिरात पुरोहितांच्या मंत्रोच्चारात विजयी पांडुरंगाचा महाभिषेक करण्यात आला . तर सकाळच्या सत्रात बाहेरील नाथ मंदिरातील नाथ समाधी पादुकांचा महाभिषेक जिल्हाधिकारी दिलीप स्वामी तसेच पैठणचे आमदार विलास बापू भुमरे यांनी सपत्नीक केला .





# १०८ कुंडी भव्य महाविष्णू याग व संगीत रामकथा आणि अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

➤ या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने भक्तजनांनी लाभ घ्यावा-ह.भ.प.केशव महाराज शास्त्री






➤ **केज/प्रतिनिधी :**

केज शहरापासून जवळच असलेले बीड रोडवरील श्रीकृष्ण आश्रम भक्तीपरिवार येथे बुधवारपासून १०८ कुंडी भव्य महाविष्णू याग व संगीत रामकथा आणि अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होत आहे तरी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने भक्तजनांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमाचे संस्थापक ह .भ .प . भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे .

या यज्ञ पूजेस जोडीने किंवा एकट्यालाही बसता येईल यज्ञ वेळ दररोज सकाळी ८ ते ११, दिनांक १२ मार्च ते १९ मार्च पर्यंत दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत श्री ह .भ .प . परमपूज्य रामराव महाराज ढोक यांच्या मधुर वाणीतून रामकथा संपन्न होणार आहे . दररोज सायं .८ ते १० वाजेपर्यंत कीर्तन संपन्न होईल . बुधवार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत विष्णू महायज्ञास प्रारंभ होईल, गुरुवार रोजी रात्री ह .भ .प .अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन संपन्न, शुक्रवार रोजी ह .भ .प . महादेव महाराज राऊत बीड यांचे कीर्तन संपन्न होईल, शनिवार रोजी ह . भ .प . केशव महाराज उखळीकर यांचे कीर्तन संपन्न होईल, रविवार रोजी ह . भ .प . पुंडलिक महाराज देहूकर यांचे कीर्तन संपन्न होईल, सोमवार रोजी ह . भ .प . अमृताश्रम स्वामी महाराज यांचे कीर्तन संपन्न होईल, मंगळवार रोजी ह .भ .प .संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन संपन्न होईल, बुधवार रोजी ह .भ .प . विदर्भरत्न संजय महाराज पाचेकर यांचे कीर्तन संपन्न होईल, गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ह .भ .प .रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे काल्याचे किर्तन संपन्न होईल .

केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील आणि परिसरातील श्रीकृष्ण भक्तांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन ह . भ .प . भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे .

# परिविक्षाधीन आयपीएस राहुल कुमार यांच्याकडे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचा प्रभारी चार्ज

➤ **जिल्हा प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा भाग; ९ मार्च ते ३० मे २०२६ या कालावधीसाठी जबाबदारी**





आय पी एस राहुल कुमार

माजलगाव : परिविक्षाधीन आयपीएस राहुल कुमार यांनी सोमवार (दि .९) रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याचा पदभार स्वीकारला . जिल्हा प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या अनुषंगाने त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे .

राहुल कुमार हे दि .२९ डिसेंबर २०२५ रोजी बीड येथे जिल्हा प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी रुजू झाले . प्रशिक्षणादरम्यान त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखांचे कामकाज, कार्यालयीन प्रक्रिया तसेच जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला . याशिवाय गेवराई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या कामकाजाचाही त्यांनी आढावा घेतला .पोलीस ठाण्याचे प्रत्यक्ष कामकाज समजून घेण्यासाठी त्यांच्याकडे माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचा दि .९ मार्च ते ३० मे २०२६ या कालावधीसाठी प्रभारी अधिकारी म्हणून चार्ज देण्यात आला आहे . दरम्यान, येथील पोलीस निरीक्षक बालक कोळी यांना या कालावधीत बीड येथील नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले आहे .पदभार स्वीकारल्यानंतर राहुल कुमार यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या कामकाजाला सुरुवात केली असून, नागरिकांनी कोणतीही तक्रार किंवा माहिती असल्यास पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे .

### महत्वाचे ठळक मुद्दे

● परिविक्षाधीन आयपीएस राहुल कुमार यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला . ● जिल्हा प्रात्यक्षिक प्रशिक्षणाच्या अंतर्गत ही जबाबदारी देण्यात आली .● ९ मार्च ते ३० मे २०२६ या कालावधीसाठी प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती .● पोलीस निरीक्षक बालक कोळी यांची बीड नियंत्रण कक्षात तात्पुरती बदली . ● नागरिकांनी तक्रारींसाठी पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन .